**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

---

**दिनांक २३.०४.२०२६ गुरूवार**

**मा. न्यायालयातुन आरोपीला १० वर्ष कारावासाची शिक्षा :—**

दिनांक २३.०४.२०२६ रोजी, मा. ३ रे अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपुर, श्री. एस. एच. ग्वालानी साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. ३२९/२०२४ मधील, पोलीस ठाणे हुडकेश्वर येथील अप. क्र. १६७/२०२४ कलम ३७६ (२)(एन), ३७७, ५०६ भा.दं.वि. या गुन्ह्यातील आरोपी रोशन तुळसीराम मेश्राम, वय ४२ वर्षे, रा. सावळा, ता. कुही, जि. नागपूर याचे विरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, आरोपीस कलम ३७६(२)(एन) भा.दं.वि. अन्वये १० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व २५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०१ वर्षे सश्रम कारावासाची, कलम ३७७ भा.दं.वि. अन्वये ०७ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व २५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०६ महिन्याची सश्रम कारावासाची, तसेच, कलम ५०६ भा.द.वि. अन्वये ०१ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व २,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास १५ दिवस अतिरीक्त सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली.

दिनांक ०३.०३.२०२४ ते दिनांक ०४.०३.२०२४ चे ०५.०० वा चे दरम्यान, पोलीस ठाणे एम.आय. डी.सी. हद्दीत राहणाऱ्या २८ वर्षीय फिर्यादी हिला एम्स हॉस्पीटल येथे नौकरी लावून देतो, असे आमिष दाखवून आरोपी याने फिर्यादीस एम्स हॉस्पीटल येथे जावू असे म्हणून तिला सर्वश्री नगर येथून सोबत घेतले व मटकाझरी येथील जंगलात तलावाचे जवळ नेवून, धमकावून तिचेवर ईच्छेविरूध्द लैंगिक अत्याचार करुन तिचेसोबत अनैर्सर्गिक कृत्य केले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे आरोपी विरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीला दिनांक ०५.०३.२०२४ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी पोउपनि. महेश पांडे यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती कल्पना पांडे यांनी तर, आरोपी तर्फे ॲड. श्रीमती भावना मेश्राम यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून मनापोशि. समता डोकरमारे/२४८८ यांनी काम पाहिले.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे मानकापूर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

पोलीस ठाणे मानकापूर हद्दीत, प्लॉट नं. १२५, शशिकांत सोसायटी, उत्थाननगर, नागपुर येथे राहणारे फिर्यादी तिलकचंद साबुलाल खरपुरीया वय ५४ वर्षे यांचे मुलीचे दिनांक २१.०४.२०२६ रोजी लग्न झाले. मुलीचे लग्नाचा रिसेप्शन कार्यक्रम गोधनी ता. काटोल येथे असल्याने फिर्यादी दिनांक २२.०४.२०२६ चे १९.०० वा. ते दिनांक २३.०४.२०२६ चे ०३.०० वा. चे दरम्यान, आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह रिसेप्शन समारंभाकरीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व

कडी–कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, किचनमधील लोखंडी आलमारीतील रोख २,८०,०००/–रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ४,९६,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

यांप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापूर येथे पोउपनि. जावेद तळवी यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे कोतवाली :– फसवणुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

पोलीस ठाणे अजनी हद्दीत, रेल्वे मस्जीद जवळ, जे–५८, ब्लॉक नं. ०२, नागपूर येथे राहणारी आरोपी महिला खैरून्निसा मोहम्मद समद, हिने खसरा नं. ९३२४,९३/४,९३/५, मौजा बेसा, आरजी. १.६० हेक्टर आणि १.२१ हेक्टर ४.२ पटवारी हलका नं. ३१ या जमिनीचे कायदेशीर वारस नसतांना नियोजित पध्दतीने कट रचून मोहम्मद समद मोहम्मद ईसाक (आरोपीचे पती) यांचे मृत्युनंतर नमुद जमीनीचे बनावट कागदपत्र तयार करुन पोलीस ठाणे कोतवाली हद्दीत, ब्लॉक नं. २०३, सदोदय कॉम्प्लेक्स, दारोडकर चौक, सी.ए. रोड येथे फिर्यादीस दाखविले व फिर्यादी यांना विश्वासात घेवून नमुद जमीन विक्रीचा फिर्यादीसोबत करार केला. दिनांक ३१.०८.२०२२ चे १४.०० वा. ते १५.०० वा. चे दरम्यान, आरोपी हिने फिर्यादी कडून कराराचे व ईतर असे एकुण १०,०२,११,०००/–रू. स्वत: घेवून फिर्यादी यांची कट रचून, विश्वासघात करून दस्ताऐवजाद्वारे तोतयागिरी करून फसवणूक केली.

यांप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे कोतवाली येथे पोउपनि. खुशाल राठोड ८४२११२०७३९३ यांनी आरोपींविरूध्द कलम ४०६, ४२०, ४६५, ४६८, ४७१ भा.दं. वि. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे ईमामवाडा :–** दिनांक २२.०४.२०२६ चे २३.४५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीत रामबाग, मिलींद गडपायलेच्या घराजवळ, पाचनल चौक येथे राहणारे इसम नामे नितीन कृष्णराव मेश्राम वय ४७ वर्ष हे घरात सुरू असलेला कुलर अचानक बंद पडल्याने बघण्याकरीता इलेक्ट्रीक बोर्डमधील प्लग काढत असतांना अचानक करंट लागल्याने खाली पडून बेशुध्द झाले. त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल अजनी येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

यांप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे इमामवाडा येथे पोउपनि. निखिल चाफले यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी/साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. अति. मुख्य न्याय दंडाधिकारी, साहेब नागपूर | ३१००२८० /११९६ | कलम ३२६ ३४ भा.दं.वि. | १) प्रविण मधूकर मुळे, वय १९ वर्षे, रा. जुनी शुक्रवारी तेलीपूरा सहारेचे घराजवळ नागपूर. | २७.०४.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | २) नरेंन्द्र उर्फ बाल्या श्यामरावजी बंधारे, वय २० वर्षे, रा. गुप्ता हॉटेल मागे, पोलीस ठाणे कोतवाली नागपूर | |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपूर शहर.**